RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक ९१] मंगळवार, जुलै २९, २०२५/ श्रावण ७, शके १९४७ [पृष्ठे ३, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक २९३**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

## सार्वजनिक आरोग्य विभाग

गो. ते. रुग्णालय संकुल इमारत, दहावा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१, दिनांक २९ जुलै २०२५.

### अधिसूचना

**कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८.**

क्रमांक PHD-१२०१६/३/२०२५-PHD(R.K.V.२).—कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ३४) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, यासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांमध्ये स्थित असलेल्या आस्थापनांच्या वर्गांना उक्त अधिनियमांच्या तरतुदी लागू करण्यासाठी निर्गमित करण्याचे प्रस्तावित असलेल्या पुढील अधिसूचनेचे प्रारूप, त्यामुळे बाधित होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तीच्या माहितीसाठी, उक्त पोट-कलम (५) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करीत आहे, आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त प्रारूप, दिनांक २८.०८.२०२५ रोजी किंवा त्यानंतर, महाराष्ट्र शासनाद्वारे विचारात घेण्यात येईल.

उक्त प्रारूपाच्या बाबतीत, उपरोक्त दिनांकापूर्वी, कोणत्याही व्यक्तीकडून, सचिव (२), महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, गो. ते. रुग्णालय प्रशासकीय इमारत, दहावा मजला, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई ४०० ००१ यांच्या कार्यालयास प्राप्त झालेले कोणतेही आक्षेप किंवा सूचना, शासनाकडून विचारात घेण्यात येतील.

### प्रारूप अधिसूचना

क्रमांक PHD-१२०१६/३/२०२५-PHD(R.K.V.२).—कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ३४) महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम १ च्या पोट-कलम (५) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून आणि कर्मचारी राज्य विमा महामंडळाशी विचारविनिमय करून व केंद्र सरकारच्या मान्यतेने महाराष्ट्र शासन आस्थापनांमध्ये नोकरीस असलेल्या व्यक्तींच्या संख्येच्या बाबतीत याबाबतीत निर्गमित केलेल्या आधीच्या सर्व अधिसूचनांचे अंशतः अधिक्रमण करून, उक्त पोट-कलम (५) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे एक महिन्याची नोटीस दिल्यानंतर, उक्त अधिनियमाच्या सर्व तरतुदी, ज्या दिनांकास, खालील अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे आस्थापनांच्या वर्गांना लागू असतील तो दिनांक २८.०८.२०२५ याद्वारे, नियत करीत आहेः

## अनुसूची

| आस्थापनांचे वर्णन (१) | आस्थापना ज्या क्षेत्रात स्थित आहे ती क्षेत्र (२) |
|---|---|
| मागील बारा महिन्यांतील कोणत्याही दिवशी ज्यांमध्ये दहा किंवा अधिक व्यक्ती नोकरीस आहेत किंवा होत्या अशा पुढील आस्थापना,—<br>१. शैक्षणिक संस्था (व्यक्ती, विश्वस्त, सोसायट्या किंवा इतर संघटना यांद्वारे चालविल्या जाणाऱ्या सार्वजनिक, खासगी, अनुदानित किंवा अंशतः अनुदानित संस्था)<br>२. वैद्यकीय संस्था (निगम, संयुक्त क्षेत्र, विश्वस्त, धर्मदाय व खासगी मालकीची रुग्णालये, नर्सिंग होम्स, रोगनिदान केंद्र, विकृतिचिकित्सा प्रयोगशाळा) | ज्या क्षेत्रांमध्ये, कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ (१९४८ चा ३४) याच्या तरतुदी, या अधिनियमाच्या कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये अगोदरच अंमलात आणलेल्या आहेत ती सर्व क्षेत्रे. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**चंद्रकांत विभूते,**
शासनाचे उप सचिव.

## PUBLIC HEALTH DEPARTMENT

G.T. Hospital Complex Admin Building, 10th Floor, Lokmanya Tilak Marg,
Mumbai 400 001, dated 29th July 2025.

*NOTIFICATION*

Employees' State Insurance Act, 1948.

No. PHD-12016/3/2025-PHD(R.K.V.2).—The following draft of notification, which is proposed to be issued in exercise of the powers conferred by sub-section (*5*) of section 1 of the Employees' State Insurance Act, 1948 (34 of 1948), in its application to the State of Maharashtra, to extend the provisions of the said Act to the classes of establishments situated in the areas as specified in the Schedule appended thereto, is hereby published as required by said sub-section (*5*), for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 28.08.2025.*

2. Any objection or suggestions which may be received by the Secretary (2) to the Government of Maharashtra, Public Health Department, G.T. Hospital Complex Administrative Building, 10th Floor, Lokmanya Tilak Marg, Mumbai 400 001, from any person with respect to the said draft before the aforesaid date will be considered by the Government.

*DRAFT NOTIFICATION*

No. PHD-12016/3/2025-PHD(R.K.V.2.—In exercise of the powers conferred by sub-section (*5*) of Section 1 of the Employees' State Insurance Act, 1948 (34 of 1948), in its application to the State of Maharashtra and in partial supersession of all earlier notifications issued in this behalf with respect to the number of persons employed in establishments, the Government of Maharashtra in consultation with the Employees' State Insurance Corporation and with the approval of the Central Government, after having given one month's notice as required by said sub-section (*5*), hereby appoints the 28.08.2025, to be the date on which all the provisions of the said Act shall extend to the classes of establishments as specified in the Schedule below :—

*Schedule*

| Description of Establishments<br>(1) | Areas in which the Establishments are situated<br>(2) |
|---|---|
| The following establishments wherein ten or more persons are employed, or were employed on any day of the preceding twelve months, namely :—<br>1. Educational Institution (including public, private, aided or partially aided run by individuals, trustees, societies or other organization.)<br>2. Medical Institutions (including Corporate, Joint Sector, Trust, Charitable & Private Ownership Hospitals, Nursing Homes, Diagnostic Centers, Pathological Lab). | All areas where provisions of the Employees' State Insurance Act, 1948 (34 of 1948) have already been brought into force under sub-section (*3*) of section 1 of the Act. |

By order and in the name of the Governor of Maharashtra.

CHANDRAKANT VIBHUTE,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.